# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र.१, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५.

**दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४/२२१६३९६५, फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६**

**संकेत-स्थळ** : **www.merc.gov.in**

**ई-मेल** : **mercindia@merc.gov.in**

जाहिरात क्र. १२/२०१९-२०

## जाहीर नोटीस

**कृषी पंपासाठी होणाऱ्या वीज वापराच्या विश्लेषणात्मक अभ्यासासाठी नेमलेल्या अभ्यास गटाच्या अंतरिम अहवालावर अभिप्राय मागविण्याबाबत**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (आयोग), सन २०१७ च्या प्रकरण क्र. १९५ मध्ये दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये कृषी पंपासाठी होणाऱ्या वीज वापराबाबत अभ्यास गट गठीत केला होता. अभ्यास गटाची उद्दिष्टे, अभ्यास गटाचे सदस्य, ज्यामध्ये विशेष निमंत्रित म्हणून महावितरण कंपनीचा समावेश आहे, आणि त्यांची संबंधित कार्यकक्षा आयोगाच्या दिनांक २ नोव्हेंबर, २०१८ च्या अधिसूचनेन्वये आयोगाच्या संकेत-स्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर, डॉ. शशांक भिडे, निवृत्त अधिकारी, एनसीएईआर आणि श्री. पी.एच. भागूरकर, अर्थशास्त्र आणि सांख्यिकी विभाग, महाराष्ट्र शासन यांची सेवा अनुक्रमे सल्लागार आणि विशेष निमंत्रित म्हणून अभ्यास गटाला उपलब्ध करून देण्यात आली.

अभ्यास गटाच्या बैठकीदरम्यान सादर करण्यात आलेल्या प्राथमिक विश्लेषणावर, महावितरण कंपनीने दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी त्यांचा अभिप्राय सादर केला. त्यानंतर, अभ्यास गटाने त्यांचा अंतरिम अहवाल, त्यावरील निष्कर्षासह, दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजी सादर केला आहे. दिनांक २२ जानेवारी, २०२० रोजीचा हा अहवाल तसेच दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजीचे महावितरणचे अभिप्राय, आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहेत.त्यानुसार, महावितरण कंपनीसह सर्व हितसंबंधितांकडून 'कृषी पंपासाठी होणाऱ्या वीज वापराबाबत अभ्यास गटाच्या अंतरिम अहवालावर' लेखी अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती मागविण्यात येत असून त्या **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५** येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा mercindia@merc.gov.in या ई-मेल द्वारा पाठवाव्यात.

दि. १७ फेब्रुवारी, २०२० रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय आणि सूचना आणि / किंवा हरकती अहवालास अंतिम स्वरूप देण्यापूर्वी अभ्यास गटाकडून विचारात घेण्यात येतील. त्यानंतर, अभ्यास गट आयोगास अंतिम अहवाल सादर करील.

**दिनांक** : **२४ जानेवारी, २०२०** — **सचिव,**

**ठिकाण** : **मुंबई** — **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**Size 8 X 16**